## भारतापेक्षा वेगळा व्हिएतनाम

पहिल्या दिवशी पाहिले होते तसेच, हनोईमधल्या दुसऱ्या दिवशीही गजबजलेल्या रस्त्यावर फुटपाथवर खुर्ची टाकून केशकर्तन करणारे फिरते न्हावी दिसले.जवळच्या भिंतीवर आरसा लटकवलेला आणि आजूबाजूची गर्दी वजा करून मन लावून एका आजोबाचे केस कापणारा एकाग्र न्हावी. नंतर सायगाव(हो चिमिन्ह सिटी) मधे मात्र असे न्हावी दिसले नाहीत. दुचाकी वरून तर काय काय वाहून जाताना दिसलं. अख्ख्या डुकराचं कलेवर,किंवा पिंजऱ्यातलं डुक्कर,बदकं,कोंबड्या,पक्षी,दोन्ही बाजूला बांधलेल्या मोठ्या पिपांत मासे किंवा इतर सामान,गाद्या गिर्द्या आणि असंख्य प्रकार. तसंच आईबाप आणि मधे एक मूल उभं अशी भारतातल्या सारखी दुचाकीवरची कुटुंबही दिसली. पहिल्या दिवशी कल्पना केली होती तशी हनोईतली टूरिस्टी ठिकाणं अगदी स्वच्छ नीटनेटकी. इतर आशियाई देशांसारखे हे लोकही मुळातले सुपारी-तंबाखू खाणाऱ्यातले. तसे ते मात्र दिसले नाहीत फारसे. पूर्वीच्या तैवानात आणि आताच्या मलेशिया,थायलंड, कंबोडिया इथे दिसले होते.तसे असते तर रसत्यावर थुंकण दिसलं असतं का? का इतर शिस्तीबरोबर त्याचीही शिस्त या लोकांनी नव्यानं अंग बाणवलेली असती? असे प्रश्न पडले. त्या बद्दल विचारलं तर गाईड म्हणाला "आमच्याकडे तंबाखू खाण्याची फारशी पद्धत नव्हती.आता सुपारी फक्त छोट्या छोट्या गावाकडचे लोक विशेषतः बायका खातात. शहरातच मोठे झालेले लोक नाही खात." यांच्याकडे पान-सुपारी-तंबाखूची जागा आधुनिक गुटख्यानं घेतलेली नाहीये म्हणूनच हे अशी स्वच्छता राखणं सोपं गेलंय.नाही तर काय रस्ते,कोपरे लाल केलेच असते. असा आपला कुचकट विचार आलाच.

पहिल्या दिवशीच्या अनुभवातच ग्रह करून घेऊ नये हे लक्षात आलं कारण काल पाहिलेली कचऱ्याची छोटी छोटी ठिगळं संध्याकाळी कचरा वाहुन नेणाऱ्यांसाठी केलेली असावी असं लक्षात आलं.दिवसातून दोन वेळा रस्ते झाडतात इथे.तसे कर्मचारीही दिसले. एकूण हनोई आवडलंच. फ्रेंचांनी

आखलेला,बांधलेला फ्रेच परिसरच नाही तर त्या आधी आणि नंतर स्थानिक लोकांनी आखलेला बांधलेला काही परिसरही रम्य वाटला.गजबजलेला,गिचमिड,लहान गल्ल्यांचाही काही परिसर होताच.पण बऱ्यापैकी स्वच्छ.



अर्थातच पूर्वीच्या हनोईचं चित्र यापेक्षा वेगळं होतं.इतका नेटकेपणा आणि स्वच्छता नव्हती. या बद्दलही आधी वाचलेलं होतंच. हे तळ्यांचं शहर. काही नैसर्गिक काही गरजेप्रमाणे माणसांनी तयार केलेली. गर्दीच्या भागातही राखलेले वृक्ष.इवल्या इवल्या आणि बंगलेवजा दोन्ही प्रकारच्या घराघरात लावलेली झाडं. हिरवंच शहर. शहराच्या मध्य भागातलं विस्तीर्ण 'होन किएम' तळं आणि त्यातल्या बेटावरचं देऊळ पाहिलं.या तळ्याभोवती आणि देवळात स्थानिक आणि



पर्यटकांचा राबता सतत असतो. कोल्हापूरातल्या सारखा हा इथला रंकाळा म्हणाना किंवा पुण्यातली सारसबाग.पण तळ्याची स्वच्छता अगदी आश्चर्यकारक. कुठल्याही प्रकारची घाण तरंगताना दिसली नाही. आपल्या सारखाच एक देश पण अधिक पोळलेला जर हे करू शकतो तर आपण का करू शकत नाही अशी खंत वाटली. या देशाने खूप सारी युद्धं अनुभवली आहेत.खूप पूर्वी आपापसात आदिवासी टोळ्यांची मग मंगोलिया,चीन,फ्रेंच यांची चढाई आणि कबजा त्यातून सुटका,

नंतर अलीकडचं फार भयानक आणि सर्वनाशाच्या उंबरठ्यावर नेणारं अमेरिकनांशी. अगदी घराघराला बॉम्ब शेल्टर करावा लागण्याइतकं. हो चि मिन्हच्या सुरवातीच्या काळात थोडी स्वस्थता तीही उत्तर भागात.उत्तरेत रशियाचा प्रभाव. दक्षिणेत अमेरिकेचा. १९७५ पर्यंत चाललेली उलथापालथ. स्वस्थता शोधण्याची धडपड, अभाव आणि जगण्याशीच जुळवून घेणं असं सगळं. पण त्या मानानं खूपच विकास झालेला दिसतो आपल्या तुलनेत.तो शिस्तीच्या रूपानं अधिकच ठसला.

रस्त्यावर दुचाकींची गर्दी पण रहदारीचे नियम पाळणारे लोक.खूप गर्दी असूनही हॉर्नचा भडिमार नाही. झेब्रा क्रॉसिंगशी थांबलेली वाहनं. पादचाऱ्यांना अग्रक्रम. कुठूनही रस्ता ओलांडायची मुभा



असावी असं वाटण्याइतकी. कारण शहरात वाहनांचा वेग ४० च्या आत. काल रस्त्यावर कचरा दिसला होता बऱ्यापैकी पण एक लक्षात आलं की रस्ते दिवसात दोन वेळा झाडले जातात.रस्त्यावर खाण्यापिण्याचे पदार्थ विकणाऱ्यांची संख्या सगळीकडेच खूप पण त्यामानानं कचरा फारच कमी,अगदी बाजार भागातही. पुण्यातल्या बोहरी आळी,बुधवार-रविवार पेठेतल्या सारखी एकेक गल्ली एकेका प्रकारची विक्री करणारी.

आधुनिक कपडे,पारंपरिक कपडे,अंर्तवस्त्रं, बूट-चपला,चष्मे-गॉगल,शिलाई-सजावटीचेसामान,स्टेशनरी,बॅगा-पिशव्या,फुलं,फळं,भाज्या,बॉनसाय,पेट्स,फर्निचर अशा सगळ्या गल्ल्या नजरेखालून गेल्या.खूप आपल्या सारखं वाटणारं पण नव्या शिस्तीचा,ऑर्गनायझेशनचा पोशाख ल्यायलेलं.



एथनिसिटी म्युझियम पाहिल्यावर तर आपण आपल्या डायव्हर्सिटाचा अतिच गवगवा करतो असं वाटलं. इथेही प्रचंड डायव्हर्सिटी आहे. दिसायला माणसं सारखी वाटत असली तरी त्याचं सांस्कृतिक वेगळेपण ते जपतात. तसा सगळा इंडोचायनाचा परिसर सांस्कृतिक साम्य राखणारा आहे तरीही जमाती जमातींचे फरक भाषेसहित आहेतच. आता राजकीय दृष्ट्या वेगळ्या असलेल्या शेजारी देशांतून भटकत येऊन इथे स्थायिक झालेल्या असंख्य जमाती आणि अनेक धर्म असं वैविध्य. देशात एकपक्षीय आणि समाजवादी राजकारण असल्यानं जमातींचं,धार्मिक राजकारण फारसं होत नाही असं कळलं. बुध्दिस्ट व्हिएत लोकं बहुसंख्येनं आहेत आणि इतर आदिवासी जमाती,ताओ,कन्फ्युशिअन हेही बरेच आहेत. मुसलमान,हिंदू मात्र अगदी अल्पसंख्य.कॅथॉलिक अल्प असले तरी चर्चच्या पैशाच्या बळावर राजकारणात थोडी हमरीतुमरी करतात म्हणे.असो.

हनोईतलं मुख्य ठिकाण म्हणजे हो चि मिन्ह यांचं रशियाच्या मदतीनं बांधलेलं भव्य स्मारक. परिसरात एक प्रकारचा शांत-गंभीरपणा भरून राहिलेला.रशियात आल्यासारखंच वाटलं. स्काऊटची शाळकरी मुलं मुली,त्यांचे बँड शिस्तीत बाहेरच्या प्रशस्त परिसरात शिस्तीनं उभी होती,पावसाची भुरभुर असूनही. पर्यटकही नम्रपणे रांगेत.कॅमेरे न्यायला परवानगी नसल्यानं क्यू मधे त्यांचा क्लिकक्लिकाट नव्हता. सफेद कपड्यांवर लाल-सोनेरी सजावट असलेल्या गणवेषातले शिपाई सगळीकडे करडी नजर ठेऊन होते. आत लेनिनप्रमाणे प्रिझर्व केलेला हो चि मिन्ह यांचा देह. नम्र व्हावंसं वाटलंच. नम्र व्हावंसं अधिकच वाटलं ते त्याचं घर आणि कचेरीची जागा पाहिली तेव्हा. साधेपणाची कमाल. फक्त उपयुक्ततेच्या निकषावर योजलेलं कमीत कमी फर्निचर. एक फ्रेंच पद्धतीचं आणि एक पारंपरिक पद्धतीनं

खांबावर बांधलेलं घर. त्यालाच बॉबिंग झालं तर सुरक्षित जागी जाण्याची सोय जाडलेली. गाड्याही फक्त तीन. एक वैयक्तिक वापरासाठी आणि दोन कार्यालयीन वापरासाठीच्या. तीनही साध्या,त्यातली एक रशियन. अविवाहित राहून देशाची सेवा करतो म्हणणाऱ्या या माणसाबद्दल अधिक वाचलं पाहिजे असं वाटलं. स्थानिक बाल-तरुण-वृद्धही बऱ्याच संख्येनं होते दर्शनाला आलेले. या देशात एकूणच हीरो आणि पूर्वजांना देवत्व देण्याची खूप जुनी परंपरा आहे असं आमचा गाईड सांगत होता. बुद्ध,कन्फ्युशिअस,ताओ यांची मंदिरं आणि या सगळ्यांची फिलॉसॉफि एकत्रित आणणारा एक जनरल,विद्यापीठ स्थापन करणारा राजा यांची मंदिरं पाहिली आणि गाईड म्हणाला त्याची खात्री पटली.

आपल्याकडे नालंदा होतं तसं पण लहानसं एक विद्यापीठही पाहिलं. अनेक युद्धांतून राखलेलं आणि दुरुस्त केलेलं. हुशार मुलं निवडून त्यांना ३ ते ७ वर्षांचं शिक्षण देण्यासाठी राजानं स्थापन केलेलं. इथून डॉक्टरेट झालेल्या मुलांची चायनीज लिपीत नावं लिहिलेले,पायाशी दगडी कासव असलेले दगडी फलक पाहिले. मुलींना शिक्षण नाकारण्याची परंपरा किती सर्वव्यापी आहे ते जाणवलं.परिसरातल्या बॉनसायमुळे का कुणास ठाऊक ते अधिकच ठसलं(सुंदर असले तरी) पण मग विखुरलेल्या ऑर्किड्सनी मन प्रसन्नही केलं.इथेच आवारात राजा,बुद्ध आणि इतर सन्यासी यांचं एकत्रित मंदीर आहे.त्याच्या वरच्या गॅलरीत गेले असता खाली छपरावर व्हिएतनामी डॉगच्या नोटा दिसल्या. देवाला अनेक गोष्टी समर्पित करायची पद्धत आहे त्यातलीच ही सुद्धा एक असं गाईडनं सांगितलं.

पारंपरिक व्हिएतनामी जेवण मिळणाऱ्या एका उपहारगृहात पोटपूजेसाठी थांबलो.स्थानिक पद्धतीचं डेकोरेशन शांत आणि कलात्मक होतं.मात्र परदेशी पर्यटकांची फुल्ल गर्दी.सगळ्यांची टेबलं स्थानिक पदार्थांनी गजबजलेली त्यातच जगव्यापी फ्रेंच फ्राईज उपस्थित.खूप गर्दी असूनही स्वच्छ टॉयलेट होतं तिथे. ही आपल्यापेक्षा वेगळी वाटलेली एक अत्यंत महत्वाची गोष्ट. रेस्टटॉरन्ट्स आणि सर्व पर्यटनस्थळांजवळ स्वच्छ आणि पुरेशी टॉयलेट्स होती.आपल्याकडे राजस्थाननं पर्यटन खूप चांगलं विकसित केलं आहे.पण तिथेही मेवाड मारवाडच्या सहलीत ही सोय अपवादानंच आढळली होती.

हनोईतल्या दुसऱ्या दिवसाच्या शेवटी पाहिलेला वॉटर पपेट शो म्हणजे माझ्यासारख्या पपेटिअरला पंचपक्वान्नाची मेजवानीच. ही व्हिएतनामची खासियत. हलक्या लाकडापासून तयार केलेली माणसं, मासे,सुसरी,बदकं,पक्षी,माकडं ही त्यातली पात्र. माणसांचा पोशाखही गडद रांगात,पारंपरिक.व्हिएतनामी संगीतावर बाहुल्यांचं नृत्यं आणि काही पारंपरिक मिथ्यकथा असा कार्यक्रम होता. प्रत्यक्ष पपेट्सच्या हालचाली तशा मर्यादित होत्या, फक्त हाताच्या. कारण पाय नव्हते आणि कंबरेत वाकतही नव्हत्या त्या. पण त्यांना इथून तिथे हलविण्याच्या हालचाली नजर ठरणार नाही अशा. प्रत्यक्ष माणसांनी गायलेलं, वाजवलेलं पारंपरिक, संथ आणि वेगवान संगीत.आधुनिक अकुस्टिक आणि दिव्यांची साथ.मस्त मस्त मस्त.थेटरच्या बाहेरच्या लॉबीत अनेक पारंपरिक पपेट्स मांडलेल्या



आणि लहान स्वरुपात मर्यादित हालचाली करणाऱ्या पपेट्स विकायलाही होत्या. विक्रेत्या त्यांची हालचाल करून बाहेर पडणाऱ्या प्रेक्षक-ग्राहकांचं लक्ष वेढून घेत होत्या.

हनोईत एवढं सगळं एका दिवसात झाल्यावर दमणूक इतकी झाली की बरोबर आणलेल्या गुळाच्या पोळ्या खाऊन गुरगुटून झोपून गेलो. तिसऱ्या दिवशी लवकर उठून न्याहारी करून पूर्ण दिवसाच्या हलॉंग बे आणि ग्रामीण भागाच्या सहलीसाठी निघायचं होतं.

**-सुषमा दातार**